**A**

**CCE RF/RR/ PF/PR**

ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

**KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD, MALLESHWARAM, BENGALURU – 560 003**

ಮಾರ್ಚ್/ಏಪ್ರಿಲ್ 2025 ರ ಪರೀಕ್ಷೆ-1

**MARCH/APRIL 2025 EXAMINATION-1**

# ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

# MODEL ANSWERS

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M** Code No. : **08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

(ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ/ಪುನರಾವರ್ತಿತ ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ/ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ/ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ)

( **Regular Fresh / Regular Repeater / Private Fresh / Private Repeater** )

ದಿನಾಂಕ : **21. 03. 2025 ]** **[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100**

**Date : 21. 03. 2025 ]** **[ Max. Marks : 100**

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **I.** | **पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा : 6 × 1 = 6** | |
| 1. | ‘मनोरंजन’ या शब्दाचा संधीविग्रह असा होतो –<br>(अ) मनो + रंजन (ब) मना + रंजन<br>(क) मन्य + रंजन (ड) मनः + रंजन<br>**उत्तर :** (ड) मनः + रंजन | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 2. | ''सत्ता, संपत्ती गेली तरी माणसाचा ताठा कायम राहणे'' या आशयाशी जुळणारी म्हण ही आहे –<br>(अ) गरज सरो वैद्य मरो.<br>(ब) गर्जेल तो पडेल काय.<br>(क) सुंभ जळाला तरी पीळ जळत नाही.<br>(ड) घरोघरी मातीच्या चुली.<br>**उत्तर :** (क) सुंभ जळाला तरी पीळ जळत नाही | 1 |
| 3. | ''काडीला लावलेला बर्फाचा गोड गोळा'' या शब्दसमूहासाठी एक योग्य शब्द हा आहे –<br>(अ) लॉलीपॉप (ब) कुल्फी<br>(क) सरबत (ड) चॉकलेट<br>**उत्तर :** (ब) कुल्फी | 1 |
| 4. | नामाबद्दल विशेष माहिती सांगून नामाची व्याप्ती मर्यादित करणारा शब्द म्हणजे –<br>(अ) नाम (ब) सर्वनाम<br>(क) विशेषण (ड) क्रियापद<br>**उत्तर :** (क) विशेषण | 1 |
| 5. | 'पंतोजी' या शब्दाचा समानार्थी शब्द हा आहे –<br>(अ) वैद्य (ब) पद्मनाभ<br>(क) तनय (ड) आचार्य<br>**उत्तर :** (ड) आचार्य | 1 |
| 6. | 'उद्योगी' शब्दाचा विरुद्धार्थी शब्द हा आहे –<br>(अ) कामसू (ब) उद्योगपती<br>(क) निरुद्योगी (ड) संत<br>**उत्तर :** (क) निरुद्योगी | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
| --- | --- | --- |
| **II.** | **पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा : 4 × 1 = 4** | |
| 7. | षष्ठी विभक्ती : चा, ची, चे :: सप्तमी : .................<br>**उत्तर :** त, ई, आ | 1 |
| 8. | तो गाणे गातो : कर्तरी प्रयोग :: अमेयने व्यायाम केला : .....<br>**उत्तर :** कर्मणी प्रयोग | 1 |
| 9. | मी निबंध लिहिला आहे : वर्तमानकाळ :: सगळेच सहलीला जातील : .................<br>**उत्तर :** भविष्यकाळ | 1 |
| 10. | पंचवटी : द्विगू समास :: कांदेपोहे : .................<br>**उत्तर :** कांदेपोहे : मध्यमपदलोपी समास | 1 |
| **III.** | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा : 7 × 1 = 7** | |
| 11. | आईने थळोबास कोणता नवस केला ?<br>**उत्तर :** ''बाबा थळोबा माझ्या पोराच्या कामात यश दे, तुला नारळ देईन.'' | 1 |
| 12. | आक्का अण्णाला रोज वैतागून काय म्हणत असे ?<br>**उत्तर :** ''तू मरत का नाहीस ? कशाला जगतोस भुईला भार होऊन.'' | 1 |
| 13. | बेळगावी काँग्रेस अधिवेशनात व्यासपीठावर कोण-कोण बडी मंडळी बसली होती ?<br>**उत्तर :** व्यासपीठावर महात्मा गांधीजी, नेहरू, महम्मदअली जीना, गंगाधर देशपांडे अशी मंडळी बसली होती. | 1 |
| 14. | ज्ञानेश्वरांच्या ओवीचा गौरव कोणत्या शब्दात केला जातो ?<br>**उत्तर :** ज्ञानेश्वरांच्या ओवीचा गौरव 'ओवी ज्ञानेशाची' असा केला जातो. | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 15. | विरहिणी म्हणजे काय ?<br>**उत्तर :** देवाच्या विरहाने आर्त झालेल्या भक्ताच्या अवस्थेचे वर्णन असणारी काव्यरचना म्हणजे विरहिणी होय. | 1 |
| 16. | पावसाने झोडपल्यावर गुराखी कोठे उभा राहतो ?<br>**उत्तर :** पावसाने झोडपल्यावर गुराखी गाईच्या पोटाखाली उभा राहतो. | 1 |
| 17. | 'नेनंता गुराखी' कवितेचा काव्यप्रकार कोणता ?<br>**उत्तर :** 'नेनंता गुराखी' कवितेचा काव्यप्रकार 'ग्रामीण कविता' हा आहे. | 1 |
| **IV.** | **खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा : 3 × 2 = 6** | |
| 18. | खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :<br>(अ) गहाण टाकणे.<br>(ब) पांग फिटणे.<br>**उत्तर :** वाक्प्रचार –<br>(अ) गहाण टाकणे – पैशाच्या मोबदल्यात वस्तू ठेवणे. 1<br>(ब) पांग फिटणे – कष्टाचे सार्थक होणे. 1<br>( सूचना – अर्थ सांगणे $\frac{1}{2}$ गुण<br>वाक्यात उपयोग करणे $\frac{1}{2}$ गुण )<br>( वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग व्हावा अर्थाचा नव्हे) | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 19. | अलंकार ओळखून लक्षणे सांगा.<br><br>आला हा दारि उभा वसंत फेरीवाला,<br><br>पोते खांद्यावरी सौद्याचे । देईल ज्याचे त्याला.<br><br>**उत्तर :** **अलंकार** : चेतनगुणोक्ती अलंकार 1<br><br>**लक्षण** : निसर्गातील निर्जीव वस्तू सजीव आहेत अशी कल्पना करून ती मनुष्याप्रमाणे वागतात किंवा कृती करतात असे जेथे वर्णन असते तेथे 'चेतनगुणोक्ती अलंकार' होतो. 1 | 2 |
| 20. | गण पाडून वृत्त ओळखा.<br><br>'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे.'<br><br>**उत्तर :** जे र म्य \| ते ब घु \| नि या म \| ज वे ड \| ला गे<br>– – U \| – U U \| U – U \| U – U \| – – 1<br>त \| भ \| ज \| ज \| ग ग<br>वृत्त – वसंततिलका<br>लक्षणे –<br>अक्षरे – 14<br>यती – 8 व 14 अक्षरांवर 1<br>गण – त भ ज ज ग ग | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **V.** | **खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** **7 × 2 = 14** | |
| 21. | चिं. वि. जोशी यांचा परिचय लिहा.<br>**उत्तर :** चिं. वि. जोशी – पूर्ण नावः चिंतामण विनायक जोशी जन्म – 1892 मृत्यू 1963. पुण्यात जन्म. विनोदी लेखक. पाली भाषेचा व्यासंग, प्रारंभी शिक्षक होते. पाली, इंग्रजी, मराठी विषयाचे अध्यापन. 1928 नंतर बड़ोदा सरकारचे दप्तरदार. 'सहविचार' नियतकालिकाचे संपादक. चिमणराव व गुंड्याभाऊ हे दोन मानसपुत्र.<br>* 'एरंडाचे गुऱ्हाळ', 'चिमणरावांचे चऱ्हाट', 'पुन्हा एकदा चिमणराव', 'ओसाडवाडीचे देव', 'वायफळाचामळा'<br>– विनोदी कथासंग्रह. | 2 |
| 22. | ''ये आदिवासी कभी नहीं बदलेगा'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.<br>**उत्तर :** **संदर्भ** – सदर वाक्य 'मेळघाटचे शिल्पकार' पाठातील असून लेखिका मृणालिनी चितळे आहेत.<br>**स्पष्टीकरण** – डॉ. कोल्हे तरुण मुलांसाठी प्रशिक्षण शिबिर आयोजित करीत. परंतु बाहेरून येणाऱ्या शिक्षकांना आदिवासी वातावरणाशी, परिस्थितीशी जुळवून घेता येत नसे, त्या मुलांना शिकविण्याचा कळवळा त्यांच्याकडे नसे म्हणून त्यांचा दृष्टिकोन ''ये आदिवासी कभी नहीं बदलेगा'' असा असे. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 23. | वाटणीच्या घोळाने घरातील परिस्थिती कशी झाली होती ?<br>**उत्तर :** वाटणीचा घोळ सहा महिन्यापासून सुरू होता घरात कटकटी वाढल्या होत्या. कधी शेतातली काम खोळंबून राहत होती, तर कधी चूल बंद पडत होती. आठ दिवसापासून धुसफूस वाढली होती. | 2 |
| 24. | गंगूबाईंना कोणकोणते पुरस्कार आणि उपाधींनी सन्मानित करण्यात आले ?<br>**उत्तर :** गंगूबाईना पद्मविभूषण, पद्मभूषण, तानसेन, केंद्रीय नाटक अकादमी, माणिकरत्न, गोदावरी, कर्नाटक भूषण पुरस्कार मिळाले होते. सहा विद्यापीठांनी डॉक्टरेट दिली होती. संगीत सरस्वती, संगीत सम्राज्ञी, भारतीय कंठ अशा उपाधींनी सन्मानित करण्यात आले होते. | 2 |
| 25. | ''ही बार-बार तलवार येईल का पुन्हा'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.<br>**उत्तर :** **संदर्भ –** 'भला जन्म हा' या कवितेतील काव्यपंक्ती असून कवितेचे कवी 'शाहीर रामजोशी' आहेत.<br>**स्पष्टीकरण –** येथे शरीराला उद्देशून म्हणजेच नरदेहाला 'तलवार' असा शब्द वापरला आहे. हा नरदेह मिळणे ही पर्वणी आहे. तिचा वापर योग्य कारणासाठी करून तो सत्कारणी लाव. असे कवी मनुष्याला म्हणतो. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 26. | सगळे ऋतू ग्रामीण स्त्रियांसाठी काय आणतात ?<br>**उत्तर :** सगळे ऋतू ग्रामीण स्त्रियांसाठी न संपणाऱ्या कष्टांची माळ घेऊन येतात. हे काबाडकष्ट न संपणारे आहेत. तिला प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. तरीही ती आशावादी आहे. | 2 |
| 27. | विंदा करंदीकर यांचा परिचय लिहा.<br>**उत्तर :** विंदा करंदीकर<br>पूर्ण नाव – गोविंद विनायक करंदीकर<br>इंग्रजीचे प्राध्यापक, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते, समीक्षक<br>जन्म – 1918 मृत्यू – 2010<br>कवितासंग्रह – 'स्वेदगंगा', 'मृद्‌गंध', 'धृपद','जातक'.<br>बालकविता – 'राणीचा बाग', 'एकदा काय झालं', 'परी ग परी'<br>पुरस्कार – कबीर, कोणार्क, सीनिअर फुलब्राईट, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची डी० लीट. पदवी. पुरस्काराची रक्कम विविध संस्थांना वाटली. | 2 |
| **VI.** | **खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :**<br>**1 × 3 = 3** | |
| 28. | (अ) वृक्षवल्ली आम्हा सोयरी.<br>**किंवा**<br>(ब) मरावे परी कीर्तीरूपे उरावे. | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| | **उत्तर : कल्पना विस्ताराचे मुद्दे :**<br>i) कल्पनेचा अर्थ सांगणे 1<br>ii) उदाहरण व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | 3 |
| **VII.** | **खालील प्रश्नांची उत्तरे पाच–सहा वाक्यात लिहा :**<br>**10 × 3 = 30** | |
| 29. | 'अनंतशक्तिः परमेश्वरू' या पाठातील आंधळ्यांनी हत्तीचे वर्णन कसे केले आहे ?<br>**उत्तर :** आंधळी माणसे हत्ती पाहण्यास गेली. पाय पाहिलेला म्हणाला हत्ती खांबासारखा, सोंड पाहिलेला म्हणाला मुसळासारखा, कान पाहिलेला म्हणाला, हत्ती सुपासारखा, पाठ पाहिलेला म्हणाला हत्ती भिंती सारखा, पोट पाहिलेला म्हणाला हत्ती कोथळ्यासारखा, शेपूट पाहणारा म्हणाला खराट्यासारखा. | 3 |
| 30. | किल्ल्यातील भेद जाणून घेण्यासाठी कोणत्या सरदारांनी कसे प्रयत्न केले ?<br>**उत्तर :** भेद जाणून घेण्यासाठी किल्ल्यात गेलेले सरदार म्हणजे खंडोजी माणकर, आंजूरकर पंचकळशे सुतार व दुल्ल्बाजी मोरे सरदार.<br>माणकर यांनी गुराखी बनून किल्ल्यातील गुरे राखावयाची चाकरी पत्करली. किल्ल्यातील लोकांची गुरे चारावयास न्यावी आणि फिरून किल्ल्यात जमा करावी. पंचकळशे सुतार यांनी किल्ल्यात जाऊन लोकांच्या घरी सुतारकाम करावयाचे काम पत्करले. दुल्ल्बाजी मोरे सरदार कासार बनून किल्ल्यातील लोकांच्या बायकास बांगड्या भरून बाहेर येत. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
| --- | --- | --- |
| 31. | डॉ. आंबेडकरांचे पहिले दैवत कोणते ? त्याबद्दल ते काय सांगतात ?<br>**उत्तर :** डॉ. आंबेडकरांचे पहिले दैवत विद्या होय. विद्येशिवाय माणसाला शांतता नाही, माणुसकीही नाही. विद्या महासागरासारखी आहे. सर्वांना अवगत झाली पाहिजे मानवाला जगण्यासाठी अन्नाची आवश्यकता आहे तशीच विद्येचीही आवश्यकता आहे. | 3 |
| 32. | पावसाळ्याचा हिशेब अनंत काणेकरांनी कसा घातला आहे ?<br>**उत्तर :** पावसाळा चार महिने म्हणजे एकशेवीस दिवस असतो. साठ दिवस पाऊस पडतो. उरले साठ दिवस त्यातून तीस दिवस तरी रात्रीचा पडतो. राहिलेल्या तीस दिवसात सारखा पडत नाही. घरी किंवा कामाच्या ठिकाणी असताना पंधरा दिवस पावसाचे जातात. पंधरा दिवसात पाऊस पडताना झाडाखाली किंवा कोपऱ्यात पाच मिनिट थांबून न भिजता घरी जाता येते. असे सात दिवस जातात. आठ दिवसात आपण जायला – यायला आणि जोराचा पाऊस पडायला हा योगायोग चार वेळा येतो. चार महिन्यात चार वेळा छत्रीचा उपयोग होतो तरी आपण भिजतोच. | 3 |
| 33. | चाफ्याच्या झाडाला गुलजारांनी काय म्हटले आहे ? त्याची गंमत कोणती ?<br>**उत्तर :** चाफ्याच्या झाडाला गुलजारांनी 'बडी माँ' असे म्हटले आहे 1<br>✻ चाफ्याच्या झाडाचं पान तोडलं की दुधासारखा पांढरा चीक निघतो. म्हणून 'बडी माँ' म्हणतात.<br>✻ पानं आली की फुले नसतात. फुले असले की पानं नसतात हा पाना फुलांचा लपंडाव ही त्याची गंमत. 2 | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 34. | श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?<br>**उत्तर :** श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी जीभ हासडून जीव देणार आहे. पुढे शंभर जन्म घेऊन उग्र तपश्चर्या करणार आहे. शेवटी श्रीकृष्णालाच प्राप्त करणार आहे. | 3 |
| 35. | पाहुणे कसे निगरगट्ट आहेत ते सांगा ?<br>**उत्तर :** पाहुणे हे अचानक येऊन ठाण मांडणारे आहेत ते महिनो न महिने हलण्याचे नाव घेत नाहीत. ते चोरटे, कोडगे, आळशी आहेत. त्यांच्या घरातील डबा उघडून त्यावर ते राजरोस हल्ला करतात, बाबांच्या पेटीतून विडयांचे जुडगे पळवितात. | 3 |
| 36. | मार्कंडेयाची तुलना कविने देशभक्तांशी का केली आहे ?<br>**उत्तर :** मार्कंडेय हे त्रेता युगातील एक ऋषी, ते अल्पायुषी होते. पण पुढे शंकराच्या आशीर्वादाने ते दीर्घायुषी झाले. तसे देशभक्तही स्वतःची पर्वा न करता देशासाठी आत्मबलिदान देतात, घरादाराची पर्वा न करता आत्माहुती देऊन अमरत्व मिळवितात. मार्कंडेयाप्रमाणेच ते काळावर विजय मिळवितात. | 3 |
| 37. | पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण–कोण व कशाप्रकारे याचना करीत आहेत ?<br>**उत्तर :** पृथ्वीचे प्रेम मिळावे यासाठी तारे, चंद्र, शुक्र, ध्रुव, मंगळ, धूमकेतू आदी प्रयत्न करीत आहेत. तारे नटून थटून डोक्यावर उल्का फुले टाकीत आहेत. सुधांशू घोर तपश्चर्या करून मोहवण्याचा प्रयत्न करीत आहे. शुक्र प्रभेचा पिसारा उभारून तर मंगळ लाजून लाल होत प्रीतीची याचना करीत आहे. ध्रुव संन्यस्त होऊन बसला आहे. धूमकेतू केस पिंजारून प्रेमाची याचना करीत आहे. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 38. | 'धरण' कवितेतील स्त्री गरीब आहे हे स्पष्ट करा.<br>**उत्तर :** 'धरण' कवितेतील स्त्री गरीब आहे. पहाटे उठून दळण कांडण करून तिला कामावर जावे लागते लहान बाळाला बुट्टीखाली झोपवून तिला राबावे लागते. उन्हात पायाला झाडाची पाने बांधून ती राबते. मात्र घोटभर पाण्यासाठी तिला रानोमाळ फिरावं लागते. | 3 |
| **VIII.**<br><br>39. | **खालील प्रश्नांची उत्तरे आठ–दहा वाक्यात लिहा : 4 × 4 = 16**<br>'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.<br>**किंवा**<br>'जपानी स्त्री' यावर टीप लिहा.<br>**उत्तर :**<br>* मदर्स युनियन तीन मजली संस्था<br>* पहिला मजला संस्थेचे ऑफीस, दुसरा मजला – पालकांची संस्था<br>* तिसरा मजला – शिक्षक संघटनेचे ऑफिस<br>* अध्यक्षा - 70 - 75 वर्षाच्या खूपच समाधानी<br>* संस्थेचा हेतू – बॉम्ब हल्ल्यामुळे घरादाराविना आईबापाविना पोरक्या झालेल्या मुलांना आश्रय देणे.<br>**किंवा**<br>जपानी स्त्री गोड, हसरी, लाघवी, शालीन आहे<br>* सर्वच क्षेत्रात पुढारलेली आहे – ती कोणतेही काम छोटे मोठे न समजता कप विसळण्यापासून केस कापण्यापर्यंतची कामे निर्भयपणे करते.<br>* स्वतःच्या लग्नासाठीचे पैसा गोळा करायला तिला लाज वाटत नाही.<br>* सर्व सुविधा घरात असाव्यात हा तिचा हट्ट आहे.<br>* तिने स्वतःच्या अनेक संघटना तयार करून स्वावलंबी बनली आहे.<br>* स्वभावाने खूप विनम्र व निर्भय आहे. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 40. | सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांच्या प्रतिक्रिया कशा होत्या ?<br>**किंवा**<br>टिटवं घेऊन जाताना सावित्रीबाईंना कोणकोणत्या गोष्टी आठवत होत्या ?<br>**उत्तर :** ''एक शूद्र बाई शिक्षिका म्हणून शिकवायला लागली. महाभयंकर आहे हे ! माजले हे शूद्र.'' कोणी छेड़ काढायला लागले. कोणी बाजून जायच– थुंकायचा. कोणी समोरून आडवा यायचा खाकरायचा, एकदा चार जणांनी चारी बाजूंनी रस्ता अडविला.<br>शाळेत शिकवायला लागल्यावर खिडक्या समोर माणसं उभी राहून घाण शिव्या द्यायची, ओरडायची.<br>**किंवा**<br>प्रत्येक हुंदक्याबरोबर एकेक आठवणी सांडत होत्या. जोतिबाबरोबर झालेले लग्न, त्यांचे शिकवणं, त्यांनी सुरू केलेली शाळा, काशीचा पोरगा यशवंता, पिण्याच्या पाण्याचा हौद, गुलामगिरी पुस्तक, शूद्रांचं बोर्डिंग बालहत्या प्रतिबंधक गृह, मृत्यूपत्र, सत्यशोधक समाज आदि गोष्टी त्यांना आठवत होत्या. | 4 |
| 41. | 'सत्कार' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.<br>**उत्तर :** सत्कार ही कविता मंगेश पाडगावकरांनी लिहिली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उगवून आलेल्या गवताचे पान ( हिरवे तृणपाते ) याचा सत्कार करण्यात आला आहे. त्यास नचिकेत म्हटले आहे. नद्यांना ज्वालारसाच्या उद्रेकामुळे विश्वसंहार वाटत होता परंतु हे पाते उगवून आले.<br>मातीची मृत्युवर ही मात होती. हा सृजनाचा विजयध्वज होता. पक्षांनी स्वागतगीत म्हटले, ढगांनी मुजरा केला. वाऱ्याने मातीचा गुलाल उधळला, दक्षिण उत्तर सर कोसळली, मातीतून अत्तर घमघमले, अष्ट दिशांतून अभीष्ट चिंतन करण्यात आले. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 42. | खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :<br>या भारतात बंधुभाव ..........................<br>................................................<br>................................................<br>.......................... सकलामाजी वसू दे.<br><br>**किंवा**<br>सकलास कळो ................................<br>................................................<br>................................................<br>................................ नष्ट हो जगातून.<br>**उत्तर :** या भारतात बंधुभाव नित्य वसू दे दे वरचि असा दे,<br>हे सर्वपंथ, संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे<br>नांदोत सुखे गरीब अमीर एक मतांनी<br>मग हिंदू असो, ख्रिश्चन वा हो इस्लामी<br>स्वातंत्र्य सुखा या सकलामाजी वसू दे.<br>**किंवा**<br>सकलास कळो मानवता राष्ट्रभावना<br>हो सर्वस्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना<br>उद्योगी तरुण शीलवान येथे दिसू दे, दे वरचि असा दे<br>जातिभाव विसरूनिया एक हो आम्ही<br>अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातून. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IX. | **खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा : 1 × 4 = 4 ( 2 + 2 )** | |
| 43. | एकदा नेहरूकाका सुरक्षा रक्षकांचा डोळा चुकवून बाहेर गेले. पंतप्रधान घरात नाहीत असे दिसले तेव्हा सर्वत्र शोधाशोध सुरू झाली; पण पंतप्रधानांचा पत्ता लागला नाही. शेवटी एके ठिकाणी ते सापडले. कुठे म्हणाल, तर दिल्लीत एके ठिकाणी मुलांचा मेळावा भरला होता त्या मेळाव्यात !<br>त्या मेळाव्यातील मुलांनी चाचा नेहरूंना गाणे म्हणण्याचा आग्रह केला. ते म्हणाले, ''मला गाणे येत नाही.'' परंतु मुलांच्या आग्रहास्तव त्यांनी मुलांना सांगितले, ''मी गाणे म्हणून दाखवतो पण मी करीन ते तुम्ही करून दाखवले पाहिजे.'' मुलांनी अट मान्य केली तेव्हा नेहरूकाकांनी चक्क शीर्षासन केले. मुलांनी शीर्षासन करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना ते जमले नाही आणि नेहरूकाका गाणे म्हणण्याच्या दिव्यातून सुटले.<br>**प्रश्न :**<br>(अ) सुरक्षा रक्षकांचा डोळा चुकवून गेलेली व्यक्ती कशी मिळाली ? 2<br>(ब) नेहरूकाका गाणे म्हणण्याच्या दिव्यातून कसे सुटले ? 2<br>**उत्तर :**<br>(अ) सुरक्षा रक्षकांचा डोळा चुकवून गेलेली व्यक्ती म्हणजे पंतप्रधान नेहरू होते. शोधाशोध केल्यानंतर दिल्लीत एके ठिकाणी मुलांच्या मेळाव्यात ते मिळाले. 2<br>(ब) पंतप्रधान नेहरूंनी गाणे म्हणावे असा मुलांचा आग्रह होता. आपण जे करतो ते केल्यास आपण गाणे म्हणू असे सांगून त्यांनी शीर्षासन केले जे मुलांना करणे जमले नाही. 2 | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **X.** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** **1 × 5 = 5** | |
| 44. | व्यायामाचे महत्त्व पटवून देणारे पत्र धाकट्या भावाला लिहा.<br>**किंवा**<br>बहिणीचे लग्न असल्यामुळे चार दिवस शाळेला येऊ शकणार नाही. यासाठी मुख्याध्यापकांना रजेचा अर्ज लिहा.<br>**उत्तर : पत्रलेखन :**<br>i) प्रेषक पत्ता (पत्र पाठविणाऱ्याचा पत्ता तारखेसह) 1<br>ii) मायना 1<br>iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2<br>iv) समारोप व स्वाक्षरी $\frac{1}{2}$<br>v) कोणाला पत्र पाठवायचे त्याचा पत्ता. $\frac{1}{2}$ | 5 |
| | **किंवा**<br>**रजा अर्ज :**<br>i) प्रेषक पत्ता (अर्ज लिहिणाऱ्याचा पत्ता, दिनांक) 1<br>ii) मायना (अधिकाऱ्याचा हुद्दा) 1<br>iii) विषय $\frac{1}{2}$<br>iv) मजकूर 2<br>v) सही व पत्ता $\frac{1}{2}$ | 5 |
| **XI.** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते बीस ओळी निबंध लेखन करा :** **1 × 5 = 5** | |
| 45. | (अ) माझा आवडता समाजसुधारक.<br>(ब) मराठी असे आमुची मायबोली.<br>**उत्तर : निबंध लेखनाचे मुद्दे**<br>i) आकर्षक प्रारंभ 1<br>ii) विषय ज्ञान 2<br>iii) भाषा सौंदर्य 1<br>iv) शेवट 1 | 5 |